MHNG100009462016

नि.दि.दा.क्र. ६०/२०१८

माधो उर्फ महादेव– विरुध्द – गट ग्रामपंचायत

## निशाणी क्र. ४९, ५० व ५१ वर एकत्रित आदेश

## (पारित दिनांक २ मे, २०२५)

अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले. युक्तीवाद ऐकला.

२. प्रस्तुतचा अर्ज हा वादी चे वारस अभिलेखावर दाखल करण्यासाठी, करण्यात आला आहे. वादी हे दि. ०५.०८.२०२४ रोजी मयत झाले. तसेच त्यांची पत्नी रुखमाबाई ही दि.३०.०६.२०१७ रोजी मयत झाली. त्यांच्या वारसांना अभिलेखावर दाखल करणे आवश्यक आहे. विलंब हा ९३ दिवसांचा आहे. त्यास कारण म्हणजे मैयत वादीच्या वारसांना सदर केस बाबत माहिती नसल्या कारणास्तव मुदतीत वारस रेकॉर्डवर घेण्यात आले नाही. वादीने जाणुनबुजुन विलंब केलेला नाही. सबब, वारस अभिलेखावर घेण्यास जो विलंब झाला तो माफ करण्यात यावा, व वारस अभिलेखावर घेण्यात यावे, अशी विनंती केली.

३. प्रतिवादी यांनी नि.क्र. ४९ व ५० च्या अर्जावर खुलासा दाखल केला नाही.

४. प्रकरण प्रलंबीत असतांना, मार्च,२०२० पासून कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी टाळेबंदी लागू केली होती. त्याचा परिणाम जन–जीवनासोबतच न्यायालयीन कामकाजावर देखील झाला. मा. उच्च न्यायालयाने न्यायालयीन कामकाजासाठी वेळोवेळी परिपत्रक निर्गमित केले. मा. उच्च न्यायालयाच्या परिपत्रकान्वये दिनांक ०२.०८.२०२१ पासूनन्यायालयीन कामकाज हे पूर्ववत सुरू झाले.

५. युक्तीवाद ऐकूण घेऊन दाव्याचे अवलोकन केले असता, दावा हा जाहीर घोषीत होऊन मिळण्याकरीता व निरंतरच्या मनाई हुकुमासाठी दाखल केला आहे. दाव्यामध्ये नि.क्र. ५ अन्वये तुर्तातुर्त मनाई हुकुमाचा अर्ज न्यायालयाने दि. ०४–०९–२०११ रोजी गुणवत्तेवर निकाली काढला. न्यायालयाने नि.क्र. ३६ अन्वये दि. ११.०१.२०१९ रोजी मुद्दे निश्चीत केले. अभिलेखावर नि.क्र. ४१ अन्वये वादी यांचया पुराव्याचे शपथपत्र दाखल आहे. त्यानंतर अभिलेखावर प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला.

६. वादी दि. ०५–०८–२०२४ रोजी मयत झाले व त्यांची पत्नी देखील हयात नाही. वारसांना दाव्याबद्दल माहीती नव्हती, असे त्यांनी अर्जात नमुद केले आहे. विलंब हा ९३ दिवसांचा आहे. अशा एकंदरीत परिस्थितीवरुन उत्तरीजिवितांना अधिकार आहे, असे दिसून येते. त्यामुळे अर्ज हा तुर्त तरी मंजुर करण्यास पात्र आहे, असे मी माझे मत नोंदवितो. परंतु, उशिराने कारवाई केल्याने वादी यांच्यावर शास्ती लादने हे रास्त आहे. एकंदरीत विवेचनावरुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**: आदेश :**

१. अर्ज हे नि.क्र. ४९ व ५० हे प्रत्येकी ५००/– रुपयाच्या शास्तीवर मंजुर करण्यात येतात व विलंब हा माफ करण्यात येतो. शास्ती ही तालुका विधी सेवा समिती, उमरेड यांच्याकडे अदा करावी. नि.क्र. ५१ चा अर्ज हा मंजुर करण्यात येतो.

२. मयत वादी माधो उर्फ महादेव दौलत चौधरी यांचे नि.क्र. ५१ च्या अर्जात नमुद वारस हे अभिलेखावर घेण्यात येतात.

...२...

**३.** वादी यांनी पुढील तारखेच्या आत, त्या अनुषंगाने योग्य ती दुरूस्ती करावी आणि दुरुस्ती प्रत ही अभिलेखावर दाखल करावी.

उमरेड **(रा.भा. डोळे)**

दिनांक : ०२.०५.२०२५ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उमरेड